**आबासाहेब पाटील**
**रेंदाळ सहकारी बँक लिमिटेड, रेंदाळ**
**प्रधान कार्यालय : मेनरोड,विठ्ठल मंदीर पहिला मजला, रेंदाळ**
**ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर 416 203**
Phone : **0230 - 2450123, 2451970, 245137**
Email : ho@aprsbank.com Web : www.aprsbank.com

APRS BANK

जावक क्रं. HO/60/2023-2024/2 दिनांक 01/04/2024

# परिपत्रक

विभागप्रमुख, सर्व विभाग तसेच सर्व कर्मचारी / अधिकारी, मुख्य कार्यालय व शाखा व्यवस्थापक, सर्व शाखा व शाखेतील सर्व कर्मचारी यांना कळविणेत येते कि, मा. संचालक मंडळ सभा दिनांक 30.3.2024 ठराव क्रं. 24 नुसार **आदर्श कर्ज वितरण कार्यपध्दती तथा कर्ज खातेवर आकारणी करावयाचे दंडात्मक शुल्क धोरण मंजूर केले असुन, ते पुढीलप्रमाणे राहिल.**

**प्रस्तावना :**

कर्जदारांना कर्ज फेडीबाबत शिस्त लागावी या शिस्तीमध्ये बँक व कर्जदार यांच्या संमतीने निश्चित केलेले कर्जाचे हप्ते नियत तारखेस भरणा करणे, कर्जमंजुरी पत्रातील अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पूर्तता करणे तसेच कर्ज उचलीनंतर आर्थिक पत्रके, आयकर विवरण पत्रके, स्टॉक स्टेटमेंट व कर्जास तारण असलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेचा विमा उतरविणे / नुतणीकरण करणे इत्यादीचा समावेश होतो.

रिझर्व बँक ऑफ इंडिया यांनी त्यांचे परिपत्रक दिनांक 18.08.2023 नुसार, कर्जदाराने कर्जाच्या नियम व अटीचे तंतोतंत पालन करावे, त्यांनी कर्जाचे हप्ते नियमित भरून कर्ज व्यवहार अनुषंगाने त्यांना आर्थिक शिस्त लागावी यासाठी आदर्श कर्ज वितरण कार्यपध्दती तथा कर्ज खातेवर आकारणी करावयाचे दंडात्मक शुल्क धोरण ( Fair lending practice – penal charges in loan accounts policy) करणेबाबत बँकांना कळविले नुसार सदरचे धोरण तयार करणेत आलेले आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी दिनांक 1.4.2024 पासून कर्ज मंजूर व वितरीत होणाऱ्या कर्जप्रकरणांना लागू राहिल.

**आदर्श कर्ज वितरण कार्यपध्दती तथा कर्ज खातेवर आकारणी करावयाचे दंडात्मक शुल्क धोरण :**

सदरचे धोरण कर्जपुरवठा अनुषंगाने असलेने, या धोरणाचे पुढीलप्रमाणे तीन पोटभाग करणेत आलेले आहे.

1. कर्जमंजूरी पुर्व बाबी :

   यामध्ये बँकेच्या शाखा कडे कर्जासाठी मागणी केलेल्या व्यक्तींच्या प्राथमिक छाननी अनुषंगाने, उद्योग व्यवसाय ठिकाणाची स्थळ पाहणी,कर्जास तारण देणाऱ असलेल्या मिळकतीची पाहणी, अर्जदार व जामिनदारांची कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभूमी तसेच सभासदत्व यांचा समावेश होतो. सदर प्राथमिक छाननीनंतर कर्ज मागणी केलेली व्यक्ती पात्र ठरलेस त्याचेकडून पुढीलप्रमाणे शुल्क भरुन घेतले जाईल.

   अ) कर्ज प्रोसेस फि –

| अ.नं. | शुल्क तपशिल | शुल्क आकारणी | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | शुल्क (रू.) | जीएसटी (रू.) | एकूण शुल्क (रू.) | |
| 1 | कर्ज मागणी अर्ज (फॉर्म ) सोनेतारण व ठेवतारण कर्ज | 50.00 | 9.00 | 59.00 | पूर्वी कर्ज व्हिजीट फी व प्रोसेस फि स्वतंत्रपणे घेतली जात होती. त्यामध्ये बदल करुन एकत्रित प्रोसेस फि या सदराखाली दर्शविलेली आहे. |
| 2 | कर्ज मागणी अर्ज (फॉर्म ) इतर कारणासांठी चे कर्ज | 250.00 | 45.00 | 295.00 | |
| 3 | कर्ज प्रोसेस फि | | | | |
| | रु. 1.00 लाखापर्यंत | 500.00 | 90.00 | 590.00 | |
| | रु. 1.00 लाखाचे वर ते रु. 3.00 लाखापर्यंत | 800.00 | 144.00 | 944.00 | |
| | रु. 3.00 लाखाचे वर ते रु. 5.00 लाखापर्यंत | 1500.00 | 270.00 | 1770.00 | |
| | रु. 5.00 लाखाचे वर ते रु. 7.00 लाखापर्यंत | 1800.00 | 324.00 | 2124.00 | |
| | रु. 7.00 लाखाचे वर ते रु. 10.00 लाखापर्यंत | 2100.00 | 378.00 | 2478.00 | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रु. 10.00 लाखाचे वर ते रु. 15.00 लाखापर्यंत | 3000.00 | 540.00 | 3540.00 | |
| | रु. 15.00 लाखाचे वर ते रु. 20.00 लाखापर्यंत | 4500.00 | 810.00 | 5310.00 | |
| | रु. 20.00 लाखाचे वर ते रु. 25.00 लाखापर्यंत | 5500.00 | 990.00 | 6490.00 | |
| | रु. 25.00 लाखाचे वर ते रु. 30.00 लाखापर्यंत | 7000.00 | 1260.00 | 8260.00 | |
| | रु.30.00 लाखाचे वर | 8500.00 | 1530.00 | 10030.00 | |

## ब) क्रेडिट इन्फॉर्मेशन रिपोर्ट फि –

अर्जदाराचे क्रेडिट इन्फॉर्मेशन रिपोर्ट म्हणजेच त्यांने यापूर्वी घेतलेल्या कर्जाच्या व्यवहाराबाबत ची माहिती घेणे.

रिझर्व बँकेने मान्यता दिलेल्या व बँक त्यांच्याकडे माहिती पाठवित असलेल्या खालील क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपन्यांकडून त्याचे कर्जव्यवहाराबाबतची माहिती जरुर ते शुल्क भरुन घ्यावी लागते. सदरचे शुल्क कर्जमागणी करणाऱ्या व्यक्तिकडून रोखीने भरून घेतले जाईल वा त्याचे सेव्हिंग खात्यातून त्याच्या सुचनेनुसार (स्लिप वा चेक) भरुन घेतले जाईल.

1. Trans Union CIBIL
2. Equifax
3. Experian
4. CRIF High Mark

**क) तारण द्यावयाचे स्थावर व जंगम मालमत्ता बाबतचा शोध अहवाल ( Search Report ) व मुल्यांकन अहवाल (Valuation Report)**

- कर्ज मागणीदार यांनी बँकेच्या पॅनेलवरील वकिलांचेकडून तारण द्यावयाचे स्थावर व जंगम मालमत्ता बाबतचा शोध अहवाल ( Search Report) जरुर ती त्यांचे शुल्क परस्पर भरून कर्जप्रस्तावासोबत सादर करावयाचा आहे.
- कर्ज मागणीदार यांनी बँकेच्या पॅनेलवरील इंजिनिअर तथा व्हॅल्युअर यांचेकडून तारण द्यावयाचे वाहनांचे मुल्यांकनकार ,/ सर्व्हेअर, मशिनरीचे मुल्यांकनकार व शेतजमिनीचे मुल्यांकनकार यांचा मुल्यांकन अहवाल (Valuation Report कर्जमागणीस लागूप्रमाणे ) जरुर ती त्यांचे शुल्क परस्पर भरून कर्जप्रस्तावासोबत सादर करावयाचा आहे.
- कर्जमागणीदाराकडून वकिल व मुल्यांकनकार यांनी अवास्तव शुल्क आकारणी करु नये म्हणून बँकेकडून शोध अहवाल व मुल्यांकन अहवालाबाबत आकारावयाची शुल्क वेळोवेळी निश्चित करुन पॅनेलवरील वकिल व मुल्यांकनकार यांना कळविले जाईल.

**ड)कर्ज मागणी / प्रस्ताव रु. 10 लाख किंवा त्याचे वर असलेस सनदी लेखापाल यांचा छाननी अहवाल सादर करणे.**

अर्जदाराची कर्ज मागणी / प्रस्ताव रु. 10 लाख किंवा त्याचे वर असलेस, अर्जदाराने कोणत्याही सनदी लेखापाल ( Chartered Accountant ) यांचेकडून त्याचे प्रस्तावाची छाननी (Appraisal) अहवाल प्रस्तावासोबत सादर करणेचा आहे. सनदी लेखापाल ( Chartered Accountant ) यांची छाननी (Appraisal) शुल्क संबंधित अर्जदाराने त्यांना आदा करणेचे आहे.

अर्जदाराने सादर केलेले सनदी लेखापाल ( Chartered Accountant ) प्रस्तावाचा छाननी (Appraisal) अहवाल प्रसंगी बँक पॅनेलवरील वा तिर्हाईत सनदी लेखापाल ( Chartered Accountant ) यांचेकडून फेर छाननी करुन घेईल. त्याबाबत होणारे शुल्क रु. 500/- अर्जदाराने बँकेकडे रोखीने भरून घेतले जाईल वा त्याचे सेव्हिंग खात्यातून त्याच्या सुचनेनुसार (स्लिप वा चेक) भरुन घेतले जाईल.

## 2. कर्जमंजूरी नंतरच्या बाबी :

बँकेने कर्जमागणी अर्जास अनुसरुन कर्ज मंजूर केलेनंतर कर्ज मंजुरी पत्रातील अटी / शर्ती व कागदपत्रे यांची पूर्तता वेळेवर करणे आवश्यक आहे. कर्जदाराने खालील बाबी वेळेवर पूर्ण केल्या नाही तर त्याबाबतीत पुढीलप्रमाणे विलंब शुल्क आकारले जाईल.

| अ.नं. | शुल्क तपशिल | विलंब कालावधी | शुल्क आकारणी | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | शुल्क (रू.) | जीएसटी (रू.) | एकूण शुल्क (रू.) | |
| 1 | रजिस्टर तारण गहाण खतानुसार कर्जदाराने त्याचे तारण मिळकतीवर 1 महिन्याचे आत कर्जबोजा नोंद न केलेस | • 1 महिना नंतर पण 2 महिनेचे आत. | 100.00 | 18.00 | 118.00 | |
| | | • 2 महिना नंतर पण 3 महिनेचे आत. | 200.00 | 36.00 | 236.00 | |
| | | • 3 महिन्याचे वर. | 500.00 | 90.00 | 590.00 | |
| 2 | तारण मालमत्तेची CERSAI नोंदणी फि | | 250.00 | 45.00 | 295.00 | एकवेळ प्रति तारण (कर्ज उचलीनंतर) तारण मालमत्ता शेती व वाहन असलेस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | शुल्क लागू नाही. |
| 3 | कर्ज उचलीतून खरेदी केलेल्या मालमत्ता (जंगम व स्थावर ) ची अथवा निर्माण होणाऱ्या स्थावरबाबतची बिले , पावत्या , ईनव्हाईस, कंप्लिशन सर्टिफिकेट इत्यादी | • 15 दिवसानंतर पण 1 महिन्याचे आत.<br>• 1 महिना नंतर पण 2 महिनेचे आत.<br>• 2 महिन्याचे वर. | 100.00<br>200.00<br>500.00 | 18.00<br>36.00<br>90.00 | 118.00<br>236.00<br>590.00 | |
| 4 | विमा पूर्तता –<br>कर्जातून निर्माण झालेली मालमत्ता व सहतारण मालमत्ता | • 15 दिवसानंतर पण 1 महिन्याचे आत.<br>• 1 महिना नंतर पण 2 महिनेचे आत.<br>• 2 महिन्याचे वर. | 100.00<br>200.00<br>500.00 | 18.00<br>36.00<br>90.00 | 118.00<br>236.00<br>590.00 | |

2.1 कर्ज मंजूरी पत्रात नमूद केलेल्या अटीनुसार वरील बाबींची पूर्तता न केलेस आकारण्यात येणारे विलंब शुल्क हे संबंधित कर्जदाराचे सेव्हिंग / चालू खात्यास पुरेशी रक्कम शिल्लक असलेस, नांवे टाकून विलंब शुल्क खात्यास जमा केली जाईल.

2.2 कर्ज मंजूरी पत्रात नमूद केलेल्या अटीनुसार वरील बाबींची पूर्तता न केलेस आकारण्यात येणारे विलंब शुल्क हे संबंधित कर्जदाराचे सेव्हिंग / चालू खात्यास पुरेशी रक्कम नांवे लिहिणे इतपत शिल्लक नसलेस, सदरची रक्कम विलंब शुल्क खात्यास नांवे लिहून संबंधित खात्यास जमा केली जाईल. तदनंतर कर्जदाराने कर्जापोटी रक्कम कर्जखात्यास भरणा केलेस प्रथमता येणे विलंब शुल्क वसुल केले जाईल.

2.3 कर्ज मंजूरी पत्रात नमूद केलेल्या अटीनुसार वरील बाबींची पूर्तता न केलेस आकारण्यात येणारे विलंब शुल्क हे संबंधित कर्जदार रोखीने भरणेस तयार असलेस ते विलंब शुल्क खात्यास जमा केले जाईल.

3. कर्ज कालावधीतील व्यवहाराबाबत.

कर्जदारास कर्ज उचल केलेल्या तारखेपासून कर्जाची पूर्णता व्याजासह परतफेड होऊन खाते निरंक होईपर्यंतचा काळ हा कर्ज कालावधी पर्यंत समजला जाईल.या कालावधीतील कर्ज मंजुरी पत्रातील अटी व शर्तीनुसार पुढील बाबतीत पूर्तता न केलेस विलंब शुल्क आकारले जाईल.

| अ.नं. | शुल्क तपशिल | विलंब कालावधी | शुल्क आकारणी | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | शुल्क (रू.) | जीएसटी (रू.) | एकूण शुल्क (रू.) | |
| 1 | कर्ज मंजूर रक्कम रु. 5 लाख ते 15 लाखापर्यंत<br>(कर्ज मंजुरी पत्रातील अट व परतफेड तक्ता (Repayment Schedule) प्रमाणे मासिक हप्ता (EMI) | • 2 हप्ते थकलेस<br>• 3 किंवा 2 हप्त्याचे आत . हप्ता थकलेस<br>• 3चे वर 5 च्या आत हप्ते थकलेस .<br>• 5 चे वर 6 च्या आत हप्ते थकलेस .<br>• 6 चे वर 9 च्या आत हप्ते थकलेस .<br>• 9 चे वर 12 च्या आत हप्ते थकलेस . | 200.00<br>300.00<br>500.00<br>700.00<br>1000.00<br>1500.00 | 36.00<br>54.00<br>90.00<br>126.00<br>180.00<br>270.00 | 236.00<br>354.00<br>590.00<br>826.00<br>1180.00<br>1770.00 | |
| 2 | कर्ज मंजूर रक्कम रु. 15 लाखाचे वर ते 25 लाखापर्यंत<br>(कर्ज मंजुरी पत्रातील अट व परतफेड तक्ता (Repayment Schedule) प्रमाणे मासिक हप्ता (EMI) | • 2 हप्ते थकलेस<br>• 3 किंवा 2 हप्त्याचे आत . हप्ता थकलेस<br>• 3चे वर 5 च्या आत हप्ते थकलेस .<br>• 5 चे वर 6 च्या आत हप्ते थकलेस . | 300.00<br>500.00<br>700.00<br>1000.00<br>1500.00 | 54.00<br>90.00<br>126.00<br>180.00<br>270.00 | 354.00<br>590.00<br>826.00<br>1180.00 | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | • 6 चे वर 9 च्या आत हप्ते थकलेस .<br>• 9 चे वर 12 च्या आत हप्ते थकलेस . | 2000.00 | 360.00 | 1770.00<br>2360.00 | |
| 3 | कर्ज मंजूर रक्कम रु. 25 लाखाचे वर ते 50 लाखापर्यंत (कर्ज मंजुरी पत्रातील अट व परतफेड तक्ता (Repayment Schedule) प्रमाणे मासिक हप्ता (EMI) | • 2 हप्ते थकलेस<br>• 3 किंवा 2 हप्त्याचे आत . हप्ता थकलेस<br>• 3चे वर 5 च्या आत हप्ते थकलेस .<br>• 5 चे वर 6 च्या आत हप्ते थकलेस .<br>• 6 चे वर 9 च्या आत हप्ते थकलेस .<br>• 9 चे वर 12 च्या आत हप्ते थकलेस . | 500.00<br>700.00<br>1000.00<br>1500.00<br>2000.00<br>2500.00 | 90.00<br>126.00<br>180.00<br>270.00<br>360.00<br>450.00 | 590.00<br>826.00<br>1180.00<br>1770.00<br>2360<br>2950.00 | |

3.1 कॅश –क्रेडिट ओव्हरड्राफ्ट कर्जाबाबतीत कर्जदाराने कर्ज मंजूर करुन सुध्दा कर्जाची उचल न केलेस दर सहामाहीस पुढीलप्रमाणे वचनबध्द शुल्क (Commitment Charges) आकारले जाईल.

| अ.नं. | शुल्क तपशिल | शुल्क आकारणी | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | शुल्क (रू.) | जीएसटी (रू.) | एकूण शुल्क (रू.) | |
| 1 | कॅश–क्रेडिट / ओव्हरड्राफ्ट उचल न केलेस वचनबध्द शुल्क ( कमिटमेंट चार्जेस ) | | | | |
| 2 | रु. 5.00 लाखापर्यंत | 200.00 | 36.00 | 236.00 | |
| 3 | रु. 5.01 ते 10.00 लाखापर्यंत | 300.00 | 54.00 | 354.00 | |
| 4 | रु. 10.01 ते 25.00 लाखापर्यंत | 700.00 | 126.00 | 826.00 | |
| 5 | रु. 25.01 लाखाचे वरील | 1200.00 | 216.00 | 1416.00 | |
| 6 | स्टॉक स्टेटमेंट विलंब शुल्क | 200.00 | 36.00 | 236.00 | |

सर्वसाधारण –

1) सर्व प्रकारच्या कर्ज खातेवर सध्याच्या पध्दतीप्रमाणे नियमीत व्याज आकारणी करुन व्याज रक्कमेचे मुद्दलीकरण अथवा येणेव्याज / थकब्याज खाती नांवे टाकून त्यांची वसुली केली जाईल.
2) नियमीत व्याज रकमेत फी/ दंड शुल्क / इतर खर्च / विलंब शुल्क इत्यादी अन्य कोणतेही घटक समाविष्ठ केले जाणार नाहीत.
3) फी /दंड शुल्क / इतर खर्च / विलंब शुल्क रक्कमा योग्य प्रमाणात राहतील. कर्जदाराने नियमित कर्ज हप्ता भरला नाही अथवा कोणत्याही कारणाने कर्ज खाते थकबाकीत असलेस, कर्ज मंजुरी पत्र आणि बँकेस लिहून दिलेल्या करारपत्रातील अटी / शर्तीची कर्जदाराने पूर्तता न केलेस सर्व कर्जदारांना कर्ज रक्कमनिहाय एकसमान फी /दंड शुल्क /इतर खर्च / विलंब शुल्क लागू केले जातील. त्यामध्ये कोणताही भेदभाव केला जाणार नाही.
4) व्यक्तीगत कर्ज खातेस लागू केलेल्या फी /दंड शुल्क / विलंब शुल्क /इतर खर्च रक्कमा बिगर व्यक्ती पेक्षा जास्त असणार नाहीत.
5) फी /दंड शुल्क /वसुली खर्च/ विलंब शुल्क /इतर खर्च इत्यादी आकारणीचे कारण आणि रकमेचा उल्लेख कर्ज मंजुरी पत्र, कर्ज करारपत्र आणि बँकेच्या वेबसाईट / नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल.

6) कर्जाचा हप्ता थकलेस / संपूर्ण कर्ज खाते थकबाकीत गेलेस अथवा कर्ज मंजूरी पत्र/ करारपत्रातील अटी / शर्तीचे कर्जदाराने पालन केले नसलेस कर्जदारास याबाबत कारणासह लेखी नोटीस दिली जाईल. सदर नोटीसीत पोष्टेज फी / दंड शुल्क / वसुली खर्च / विलंब शुल्क / इतर खर्च रकमेचा उल्लेख केला जाईल. कर्जदारास लेखी कळविले जाईल.

7) प्रस्तुत धोरणाची आणि कार्यपध्दतीची अंमलबजावणी दिनांक 1 एप्रिल 2024 पासून करणेची असुन त्यानंतर अदा / नुतणीकरण केलेल्या सर्व कर्जखातेवर दंड व्याज आकारणी पध्दत बंद करुन फी / दंड शुल्क / वसुली खर्च / विलंब शुल्क / इतर खर्च आकारणी पध्दतीची उपरोक्त 2 व 3 प्रमाणे अंमलबजावणी करावयाची आहे.

8) दिनांक 31 मार्च 2024 पूर्वी आदा केलेल्या आणि चालु असलेल्या कर्ज खातेस दंड शुल्क आकारणी पध्दती पुढील रिव्हयु अथवा नुतणीकरण किंवा सहा महिनेपर्यंत यापैकी अलीकडील कालावधीपर्यंत करावी.

9) दिनांक 1 एप्रिल 2024 पासून थकित कर्ज हप्ता / संपूर्ण थकबाकी रकमेवर दंडव्याज आकारणी पध्दती बंद करणेची असलेने संगणक आज्ञाप्रणालीत दंड व्याज आकारणी कार्यपध्दती आणि सदर शिर्षक बंद केले जाईल. त्याऐवजी स्वतंत्र दंड शुल्क येणे हे नवीन शिर्षक (General Ledger) तयार केले जाईल.

10) कर्ज वितरणानंतर कर्जदाराने नियमित कर्ज हप्ता भरला नाही अथवा कोणत्याही कारणाने कर्जखाते थकबाकीत असलेस, कर्ज मंजुरी पत्र आणि बँकेस लिहुन दिलेल्या करारपत्रातील अटी / शर्तीची कर्जदाराने पूर्तता न केलेस ,वर नमूद ब व क प्रमाणे दंड शुल्क आकारणी करुन सदर रक्कमा संबंधित कर्जदाराचे कर्जखाती मुद्दलीकरण न करता सेव्हिंग व चालुखात्यास पुरेशी रक्कम शिल्लक असलेस त्यामधुन वसुल केली जाईल वा त्याचेकडून रोखीने भरुन घेतली जाईल.अशा प्रकारे रक्कम वसुल न झालेस स्वतंत्र दंड शुल्क येणे या शिर्षकाखाली (General Ledger) नांवे टाकून ताळेबंदास येणे दाखविणेत येईल. त्यानंतर सदर रक्कम वर्ग व्यवहाराने संबंधित खातेस जमा/अदा करणेत येईल. सदर रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी केली जाणार नाही. तथापि, कर्जदार कर्ज हप्ता भरणा करणेस आलेस प्रथमता भरणा रकमेतून दंड शुल्क येणे त्यानंतर व्याज व त्यानंतर मुद्दल अशा क्रमाने रक्कम भरणा करुन घेणेत येईल.

येणेप्रमाणे असे.

मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रत माहितीसाठी सविनय सादर
1) मा. चेअरमनसो
2) मा. व्हा. चेअरमनसो

प्रत माहिती व जरुर त्या संगणकीय प्रणालीमध्ये नोंदीसाठी

1. आय.टी.सुपरवायझर
2. आय.टी.ऑफीसर